# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**Savitribai Phule Pune University**

*(Formerly University of Pune)*

**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
दूरध्वनी क. (०२०) २५६२ १३४६
Website: www.unipune.ac.in

**Board of Examinations & Evaluation**
Ganeshkhind, Pune – 411 007
Phone: (020) 2562 1346
E-mail: bee@pun.unipune.ac.in


**संदर्भ** : परीक्षा/छावता/१७७२ **दिनांक:** ८/११/२०२५

प्रति,

**मा. विभागप्रमुख/संचालक,**
सर्व शैक्षणिक विभाग/केंद्र/प्रशाळा
प्रस्तुत विद्यापीठ

**मा. प्राचार्य/संचालक,**
सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था,
प्रस्तुत विद्यापीठ

**विषय : श्रेणी सुधार (Improvement of Class/Grade) योजनेअंतर्गत हिवाळी सत्र (ऑक्टोबर/नोव्हेंबर) २०२५ परीक्षेचे आवेदन पत्र/अर्ज ऑफलाईन पध्दतीने सादर करणेबाबत......**

संदर्भ : १. परिपत्रक क्र. १८२/२०२४ (संदर्भ : Exam/S&T/1480, दि. १२/०९/२०२४)
२. या कार्यालयाचे पत्र क्रमांक परीक्षा/छावता/१७२७, दि. १/११/२०२५

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय आणि संदर्भीय परिपत्रकास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, श्रेणी सुधार (Improvement of Class/Grade) योजनेसंदर्भातील विद्यापीठ अध्यादेश १६८ हा विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील https://exam.unipune.ac.in/Pages/Ordinances.html या लिंकखाली उपलब्ध आहे.

श्रेणी सुधार (Improvement of Class/Grade) योजनेअंतर्गत विविध पदवी, पदव्युत्तर पदवी/पदविका अभ्यासक्रमांच्या **हिवाळी सत्र (ऑक्टोबर/नोव्हेंबर) २०२५** परीक्षेचे आवेदन पत्र/अर्ज ऑफलाईन पध्दतीने भरावयाचे आहेत. सदर परीक्षांचे अर्ज प्रचलित पध्दतीनुसार विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील https://exam.unipune.ac.in/Pages/ManualExamForms.html या लिंकवर उपलब्ध असून पी.डी.एफ. डाऊनलोड करून विद्यापीठ प्रचलित नियमांच्या अधीन राहून योग्य शुल्कासह भरून संबंधित परीक्षा अर्ज व तद्अनुषगिक माहिती ही पुढील **ऑनलाईन लिंकवर भरून अर्जाची प्रत छाननी व तालिनीकरण कक्ष, परीक्षा विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे – ४११ ००७ येथे महाविद्यालयामार्फत दिनांक ६/११/२०२५ पर्यंत सादर करणेबाबत संदर्भीय पत्र क्रमांक २ अन्वये कळविण्यात आलेले होते.**

**https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSdQJ5rPp7BpichTGvcKi7MiTMwOKPCUJDN0P7vplBQ5jRXEag/viewform**

उपरोक्त परीक्षांचे आवेदन पत्र/अर्ज हे अध्यादेश १६८ मध्ये नमूद केलेले विद्यापीठ नियमांचे काळजीपूर्वक अवलोकन करून व संबंधित विद्यार्थ्यांना/परीक्षार्थींना अवगत करून सर्व संबंधित पात्र विद्यार्थी/परीक्षार्थी यांचेकडून वरीलप्रमाणे ऑफलाईन पध्दतीने भरून घेऊन वरीलप्रमाणे ऑनलाईन लिंकवर माहिती भरून विहित मुदतीत विद्यापीठाकडे जमा करणे आवश्यक आहे. तसेच सदरबाबत काही बदल झाल्यास ते विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

सदर पात्र विद्यार्थ्यांची परीक्षा ही **हिवाळी सत्र (ऑक्टोबर/नोव्हेंबर) २०२५** विद्यापीठ नियमित परीक्षेबरोबर चालू असलेल्या अभ्यासक्रमाच्या पॅटर्ननुसार/समकक्षतेनुसार आयोजित करण्यात येत आहे. सर्व पात्र विद्यार्थ्यांनी आपल्या अभ्यासक्रमातील समकक्ष विषय विचारात घेऊन परीक्षेस प्रवेशित व्हावे.

**तथापि, सदर मुदतीत वरील अर्ज सादर करू न शकल्यामुळे त्यास मुदतवाढ देणेबाबत विद्यार्थी, पालक, विद्यार्थी संघटना, संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांचेकडून वारंवार विनंती व पाठपुरावा करण्यात येत आहे.** त्यास अनुसरून व विद्यार्थी हित विचारात घेता वरील परीक्षेच्या परीक्षा व मूल्यमापन बाबींच्या तसेच पूर्वीच्याच अटी व शर्तीच्या अधीन राहून उपरोक्त परीक्षा अर्ज विहित शुल्कासहित भरण्याचा कालावधी **दिनांक ०८/११/२०२५ ते दिनांक ११/११/२०२५ पर्यंत मुदवाढ देण्यात येत आहे.** तसेच संबंधित महाविद्यालयाने/ परिसंस्थेने सदरचे परीक्षा अर्ज हे विहित शुल्कासह वरील ऑनलाईन लिंकवर माहिती भरून मा. वित्त व लेखा अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचे नावे देय असलेला धनाकर्ष (Demand Draft) विद्यापीठाच्या वित्त व लेखा विभागात जमा करून त्याची पोहोच घेऊन **दिनांक १२/११/२०२५, दुपारी १२.०० पर्यंत छाननी व तालिनीकरण कक्ष, परीक्षा विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे – ४११ ००७ येथे जमा करावेत.**

विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागातील/केंद्रातील/प्रशाळांमधील पात्र विद्यार्थ्यांनी उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे आपले परीक्षा आवेदन पत्र/अर्ज हे विहित शुल्कासह संबंधित विभागात/केंद्रात/प्रशाळांत विहित वेळेत सादर करावेत. **मा. विभागप्रमुख/संचालक यांनी विद्यापीठ प्रचलित नियमाप्रमाणे संबंधित पात्र विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे आयोजन करून निकाल परीक्षा विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात यावा.**

सदर पत्रातील आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात यावा तसेच उपरोक्त परीक्षेपासून एकही पात्र विद्यार्थी वंचित राहणार नाही याची सर्वोतपरी काळजी आपल्या विभाग/केंद्र/प्रशाळा/महाविद्यालय/परिसंस्था प्रशासनाने घ्यावी, ही विनंती.

**(प्रा. (डॉ.) प्रभाकर देसाई)**
**प्रभारी संचालक,**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**प्रत माहितीसाठी :** मा. वित्त व लेखा अधिकारी, वित्त व लेखा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ